# घरातून एल.सी.डी. चोरी करणारा चोरटा हिंगणघाट पोलीसांच्या जाळ्यात.

फिर्यादी नामे प्रकाश सीताराम तिजारे, वय ३८ वर्षे रा. रंगारी वार्ड, हिंगणघाट यांनी पो.स्टे.हिंगणघाट येथे रिपोर्ट दिला की, दि.१४-०२-२०२१ रोजी दुपार दरम्यान वयोवृद्ध आईला घरी ठेऊन भाजीपाला आणण्याकरीता बाजारात गेले असता कुणीतरी अज्ञात चोरट्याने घरात वयोवृद्ध व्यक्ती व्यतीरीक्त कुणीही नसल्याची संधी साधुन उघड्या दारातुन घराचे आत प्रवेश करुन बेडरुममध्ये ठेवुन असलेला सोनी ब्राव्हीया कंपनीचा एल.ई.डी. टीव्ही.कींमत १६,०००/- रुपये व नगदी ४५०/- रुपये असा एकुण १६,४५०/- रुपयांचा माल चोरुन नेला. फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरुन पो.स्टे. हिंगणघाट येथे अप क्र. १५०/२०२१ कलम ३८० भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने तात्काळ कार्यवाही करून मिळालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेऊन आरोपी नामे अंकुश गोविंदराव राखुंडे, रा. हिंगणघाट यास अटक करुन त्याचे जवळुन गुन्ह्यात चोरीस गेलेला सोनी ब्राव्हीया कंपनीचा एल.ई.डी. टीव्ही किंमत १६,०००/- रुपये व नगदी ४५०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट श्री दिनेश कदम यांचे मार्गदर्शनात मा. पोलीस निरीक्षक श्री संपत चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक श्री प्रशांत पाटणकर यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार विवेक बन्सोड, सुहास चांदोरे, पंकज घोडे, प्रशांत वाटखेडे. पो.शि.उमेश बेले यांनी केली.